# मेट्रोग्रस्त रस्ते होणार पूर्ववत

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

भुयारीकरणाची पूर्ण झालेली १०० टक्के कामे आणि स्थानकांची अध्यपिक्षा जास्त झालेली कामे, या पार्श्वभूमीवर आता ज्या स्थानकांच्या पृष्ठभागावरील कामे आटोपली आहेत, ते रस्ते पूर्ववत करण्याची कामे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने हाती घेतली आहेत.

पाच स्थानकांच्यावरील रस्त्याचा पृष्ठभाग पूर्ववत करण्याचे काम जून २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. तर, उर्वरित २२ स्थानकांच्या वरील रस्त्याचा पृष्ठभाग समतल करण्याचे काम एप्रिल २०२४ पर्यंत पूर्ण केले जाणार आहे. मेट्रो ३ मार्गात २८ स्थानके आहेत,त्या त्या ठिकाणी रस्ते खोदण्यात आले होते. २०१६ सालापासून त्या ठिकाणांचा ताबा मेट्रोने घेतला आहे. अनेक ठिकाणची वाहतूक एकेरी करण्यात आली आहे. रस्त्याचा बराच भाग मेट्रोच्या कामासाठी व्यापला आहे. स्थानकांची कामे पूर्ण झाल्यानंतर ताब्यात घेण्यात आलेल्या रस्त्यांचा पृष्ठभाग पूर्ववत करण्याची ग्वाही मेट्रोने कामे सुरू होण्यापूर्वीच दिली होती. त्यानुसार आता प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरुवात झाली आहे.

सध्या पाच ठिकाणी रस्ते पूर्ववत करण्याची कामे सुरू आहेत. सर्वात आधी एमआयडीसी, मरोळ नाका, सिप्झ, विद्यानगरी आणि धारावी या स्थानकांच्या येथील रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. ही कामे जून २०२३ पर्यंत पूर्ण होतील. लवकरच या ठिकाणचे बॅरिकेड्स हटवण्यात येतील. उर्वरित २२ स्थानकांच्या ठिकाणचे रस्ते एप्रिल २०२४ पर्यंत पूर्ववत केले जातील. स्थानक बांधण्याची कामे ८२.२ टक्के पूर्ण झाली आहेत. भुयारीकरण अर्थात बोगदे खोदण्याचे काम तर १०० टक्के पूर्ण झाले आहे.

रेल्वे रूळ टाकण्याची कामे ५०.४ टक्के पूर्ण झाली आहेत. एकूण प्रकल्प ८० टक्के पूर्ण झाला आहे. भूगर्भात विद्युतीकरण, सुरक्षाविषयक उपाय योजना, सरकते जिने बसवणे, फलाटावरील काचेचे दरवाजे, उद्वाहन आदी कामे अर्थात सिस्टिम वर्क कामे सुरू आहेत.